**Media Resource**

AURUM MEDIA

| | |
|---|---|
| Date | 23 FEB 2011 |
| Publication | Pudhari |
| Edition/ City | Mumbai |
| Page No. | 1 |
| Supplement/ segment | My Mumbai |

# एडलगिव्ह सोशल इनोव्हेशन पुरस्कारांचे वितरण

प्रतिनिधी

एडलगिव्ह कॅपिटल लिमिटेड सामाजिकतेचा भाग म्हणून मागील तीन वर्षांपासून सामाजिक कार्यात भरीव कामगिरी करणाऱ्या एनजीओना सोशल इनोव्हेशन पुरस्काराने सन्मानित करीत असते.

आरोग्य व कल्याण, शिक्षण, आर्थिक सुरक्षा व उपजीविका, नियामक, स्त्रियांचे सामाजिक-सांस्कृतिक हक्क या क्षेत्रांत भरीव कार्य करणाऱ्या पाच उत्कृष्ट एनजीओंना सन्मानित केले आहे.

यावर्षी झारखंड येथील जन चेतना मंच ही संस्था आरोग्य व कल्याण या क्षेत्रात काम करीत आहे. भारतातील ग्रामीण भागातील स्त्रियांच्या संपूर्ण आरोग्य व कल्याणाच्या विकासासाठी ही संघटना प्रयत्न करीत आहे.

तर राजस्थानातील फाऊंडेशन टू एज्युकेट गर्ल्स ग्लोबली ही शिक्षण क्षेत्रात काम करीत आहे. तर प्रज्वला ही सामाजिक संस्था आंध्र प्रदेशात सुरक्षा व उपजीविका यावर काम करीत आहे.



ही संस्था वेश्या व्यवसायातून स्त्रिया व मुले यांची सुटका करते. त्याचबरोबर स्टेप्स विमेन डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन ही तामिळनाडूतील पुदूकोट्टाई येथील स्त्रियांची संस्था असून ही खासकरून मुस्लीम स्त्रियांच्या हक्कांवर लक्ष केंद्रित करत आहे.